*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIII / Issue – III* *ISSN 2277-8063*

# महिला सक्षमीकरणातील एक दीपस्तंभ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. विजया प्रशांत पवार** श्रीमती मीनलबेन महेता कॉलेज, पांचगणी. मो. नं. – 9370701460

---

एक युगप्रवर्तक विवेकी व्यक्तिमत्व, व्यासंगी विचारवंत, बुद्धिवादी समीक्षक, समाजसेवक तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते त्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहिण्याची सर्वात न्याय भूमिका स्वीकारली आणि त्यांनी भारतीय संविधान न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या चार ध्रुवावर उभे केले. समाजातील प्रत्येक घटकाला या चार मूल्यांमध्ये सामावून घेण्याची किमया त्यांनी साधलीच पण त्याच बरोबर समाज सुधारण्याची आपली क्रांतिकारक भूमिका त्यांनी विचार आणि कृतीतून समाज पटलावर ठेवली. त्यासाठी त्यानी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समाजात हजारो वर्ष चालत आलेली विषमतेची परंपरा खंडित करण्याचे युगप्रवर्तक कार्य केले. आजची महिला सक्षम आहे, स्वतंत्र विचार करत आहे पण याचा मागोवा घेताना बाबासाहेबांच्या विचारात दडलेली क्रांती लक्षात येते. स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीच्या समाजातील विविध समस्या, प्रश्न यावर बाबासाहेबांनी केलेल्या चिंतनामुळे, समाजाची स्त्रियांकडे पाहण्याची संकुचित दृष्टी बऱ्याच अंशी बदलली त्यामुळे आजच्या महिला सक्षमीकरणासाठीयाची मोठी मदत झाल्याचे दिसते. म्हणून याच उद्देशाने आजच्या महिला सक्षमीकरणात बाबासाहेबांचे योगदान महत्वाचे आहे हे हाच उद्देश या विवेचनामागे आहे.

**महिला सक्षमीकरण संकल्पना -**

महिला सक्षमीकरण हि संकल्पना आज नवीन नाही कारण बहुतांश वेळा आपण याविषयी ऐकत आलो आहोत. समाज माध्यामांवर देखील या विषयावर चर्चा झालेली दिसते. आज शासन देखील महिलांच्या सक्षमीकरणासाठी जाणीव - जागृती करताना दिसते. त्यासाठी शासनाने २०११ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले। महिलांमध्ये स्व जाणिवेचा विकास करणे, तिच्या हक्क व अधिकारांविषयी जागृती निर्माण करणे तिला निर्णय घेण्यासाठी सक्षम बनविणे यासाठी शासनाने हे धोरण स्वीकारले. त्यादृष्टीने स्त्रियांची स्थिती – गती काय होती, काय आहे याचेही चिंतन या विवेचनातून तून होत असते व ते अधिकाधिक जाणीवपूर्वक व्हावे हेच अपेक्षित आहे. म्हणूनच मुळात महिला सक्षमीकरण म्हणजे काय ?हे जाणून घेणे हि आवश्यक आहे.

महिलांच्या समस्या, प्रश्न जाणून घेऊन विचार, कार्य, विविध कार्यक्रम, कायदे यांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांना सर्वांगीण विकासाठी संधी उपलब्ध करून देणे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व समान दर्जा प्रदान करून देणे. स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती करून देणे. महिलांना प्रशिक्षित करून दर्जा वाढवणे. या सर्व प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षणाबद्दलचे विचार –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन विधायक आणि रचनात्मक होता. त्यांच्या मते शिक्षण हा सामाजिक, आर्थिक, राजकीय क्रांतीचा मुलाधार आहे. स्त्रियांचा व एकूणच सर्व मानव जातीचा उद्धार करावयाचा असल्यास तो केवळ शिक्षणातून होऊ शकतो गौतम बुद्धांच्या मते ज्ञान म्हणजे प्रकाश' डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील स्त्रिया, पददलित यांच्या जीवनात हा ज्ञानाचा प्रकाश देऊ इच्छितात. स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे असा बाबासाहेबांचा आग्रह होता. शिक्षणाने स्त्रियांना संस्कृतीचे आणि आचर विचाराचे ज्ञान मिळते त्यामधूनच पुढारलेला समाज त्या निर्माण करू शकतात अशी त्यांची खात्री होती. म्हणूनच स्त्रियांना विस्तृत हक्क व स्वातंत्र्य देण्यासाठी शिक्षणाचा अधिकार देण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती केली.

**स्त्रियांची सामाजिक स्थिती –**

भारतीय समाजव्यवस्थेत पुरुषप्रधान संस्कृती असल्याने स्त्री- पुरुष समानतेला तिलांजली मिळाल्याचे वास्तव आपण पाहत आलेलो आहोत. समाजमनावरील धर्मभावनेची, रूढी- परंपरांची पकड आणि पुरुषांची वर्चस्व गाजविण्याची वृत्ती त्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जा मिळाला. पण हा दुय्यम दर्जा तर सोडाच किमान स्त्रीला माणूस म्हणून हि स्वीकारायला हा समाज तयार नव्हता. स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व नाही, स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाही, पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये ती एक भोगवस्तू आहे, तिला स्वातंत्र्य देऊ नये, ती पित्याच्या, पतीच्या आणि पुत्राच्या आधाराशिवाय राहू शकत नाही किंबहुना तिने स्वतंत्र राहूच नये यासारख्या मनुवादी विचारांनी तर स्त्रियांचे जगणे अधिकाधिक असह्य झाले. हे केवळ इतिहासच सांगतो असे नाही तर आज आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या समाजामध्येही याचे प्रतिबिंब पहावयास मिळते. समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा संकुचित दृष्टीकोन स्त्रियांच्या अधोगतीस कारणीभूत झालेला दिसतो.

**आजची स्त्रियांची स्थिती –**

आज स्त्रियांची स्थिती बदललेली दिसते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला त्यामुळे स्त्री साक्षर झाली स्वतंत्र झाली स्वतः निर्णय घेऊ लागली विचार करू लागले आपल्या कर्तुत्वाने तिने सर्व क्षेत्रात आपला ठसा उमटविला. शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे स्त्रीला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करता आले. शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा हा डॉ. बाबासाहेबांचा मूलमंत्र स्त्रियांच्या

बाबतीत अधिक समर्पक वाटतो. शिक्षणाचा स्त्रियांचा संघर्ष अजून संपला आहे असे म्हणता येणार नाही. पण समाजाचा स्त्रियांच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नक्कीच बदललेला दिसतो.

**स्त्रीशक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका -**

डॉ. आंबेडकरांचा स्त्रीशक्तीवर मोठा विश्वास होता. समाजातील स्त्री –पुरुष यांच्यामधील असमानता त्यांना ठाऊक होती म्हणूनच समाजातील पुरुष आणि स्त्री यांना समान अधिकार आहेत यासाठी त्यांनी सर्व समाजाला विशेषता स्त्री वर्गाला विचारप्रवृत्त केले. भारतीय संविधानात आजच्या भारतीय स्त्रियांच्या उद्धारासाठी, स्त्रियांच्या सन्मानासाठी, स्त्रियांच्या अस्मितेसाठी त्यांनी तरतूद करून ठेवली. स्त्रियांना आपल्यामधील शक्तीची, क्षमतेची जाणीव त्यांनी करून दिली. त्यांना वास्तव परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांना चळवळीमध्ये सामील करून घेतले. स्त्रियांची सक्षमता, त्यांचे प्रेरक व आधारभूत सहकार्य याची त्यांना जाणीव होती. कारण त्यांची पत्नी रमाबाई यांचा अनुभव त्यांना होता. स्त्रियांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, स्त्रियांचा सन्मान,त्यांचे समाजातील स्थान उच्चराखणे आणि त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे असे त्यांनी नमूद केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महिलांवर आणि त्यांच्या नेतृत्त्वाखालील चळवळींवर विश्वास होता. स्त्री –पुरुषांना समान लेखून स्त्रियांमध्ये अस्मिता निर्माण करण्याचा तसेच आपल्या कुटूंबाबरोबरच स्त्रियांनी समाजातील प्रश्नांकडे पहिले पाहिजे असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूच त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नासाठी प्रथम स्त्रियांनाच जागृत करण्याचा प्रयत्न केला. निरक्षर महिलांनी त्यांना बालविवाह आणि देवदासी प्रथा यांसारख्या अन्यायकारक आणि सामाजिक प्रथांविरुद्ध लढण्यासाठी प्रेरित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "महिलांनी चालवलेल्या चळवळींवर माझा ठाम विश्वास आहे. जर त्यांना खऱ्या अर्थाने विश्वासात घेतले तर समाजाचे सध्याचे चित्र बदलू शकते जे अत्यंत दयनीय आहे. भूतकाळात त्यांनी सुधारणा करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. दुर्बल घटक आणि वर्गांची स्थिती." त्यांनी नेहमीच महिलांचा त्यांच्या कामाचा आणि कष्टाचा गौरव केला.

समाजाच्या सर्व स्तरातील महिलांना विश्वासात घेतल्यास त्या सामाजिक सुधारणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतील, असेही त्यांनी नमूद केले. प्रत्येक विवाहित महिलेने आपल्या पतीच्या कार्यात मित्र म्हणून सहभागी झालेच पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. पण गुलामांचे जीवन नाकारण्याचे धैर्य तिने दाखवले पाहिजे. तिने समानतेच्या तत्त्वाचा आग्रह धरला पाहिजे. जर सर्व महिलांनी त्याचे पालन केले तर त्यांना खरा सन्मान आणि स्वतःची ओळख मिळेल खर तर आजच्या स्त्रियांच्या सक्षमीकरणाची पायाभरणी आंबेडकरांच्या विचार आणि वाणीत रुजलेली दिसते.

**डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक कार्य –**

डॉ. आंबेडकरांनी सर्वात महत्वाचे म्हणजे हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडली. त्यांनी संसदेत हिंदू कोड बिल मांडले आणि महिलांच्या मालमत्तेच्या अधिकाराबाबतच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. या विधेयकाला अनेक राजकीय नेत्यांचा तीव्र विरोध झाला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी संसदेने महिलांचे अधिकार मान्य न केल्याबद्दल नाराजी व्यक्त करत मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. त्यांनी स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळवून देण्यासाठी एक व्यवस्था निर्माण केली. हिंदू कोड बिल सदर करून स्त्रियांची समस्या किती भयंकर आहे जी समृद्ध समाजव्यवस्था निर्माण करण्यात अडथला आणू शकते हे तर सांगितलेच पण दुसरीकडे संविधानाच्या माध्यमातून त्यावर उपाय देखील शोधून दिला. त्यांनी 1920 मध्ये मूक नायक आणि 1927 मध्ये बहिष्कृत भारत ही जर्नल सुरू केली. त्यातील मुद्द्यांमधून त्यांनी स्त्री-पुरुष समानता आणि शिक्षणाची गरज यावर भर दिला आणि निराशाग्रस्त तसेच महिलांच्या समस्या उघड केल्या. महिलांना धैर्याने बोलण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी दिलेले प्रोत्साहन राधाबाई वडाळे यांनी 1931 मध्ये पत्रकार परिषदेला संबोधित केले तेव्हा दिसले. आंबेडकरांनी गरीब, निरक्षर महिलांमध्ये जागृती निर्माण केली

डॉ. आंबेडकरांचा स्त्रियांच्या सामर्थ्यावर आणि सामाजिक सुधारणा प्रक्रियेतील त्यांच्या भूमिकेवर विश्वास होता. ते म्हणतात, "महिलांनी किती प्रगती केली आहे यावरून मी समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो. लग्न करणाऱ्या प्रत्येक मुलीने तिच्या पतीच्या पाठीशी उभे राहावे, तिच्या पतीचा मित्र आणि समान असल्याचा दावा करावा आणि नकार द्यावा. त्याचा गुलाम व्हा, मला खात्री आहे की तुम्ही या सल्ल्याचे पालन कराल तर तुमचा सन्मान आणि गौरव होईल." महिलांच्या कल्याणासाठी आणि नागरी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी संविधानात अनेक तरतुदी केल्या.

भारताच्या राज्यघटनेत महिलांच्या अधिकाराचा पुरेसा समावेश प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी कलम मांडून तरतूद केली. कलम 14 - राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात समान अधिकार आणि संधी. कलम १५ लिंगाच्या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंधित करते. कलम १५(३) महिलांच्या बाजूने होकारार्थी भेदभाव करण्यास सक्षम करते. कलम ३९ - उपजीविकेचे समान साधन आणि समान कामासाठी समान वेतन. कलम 42 - कामाच्या मानवी परिस्थिती आणि मातृत्व आराम. अनुच्छेद 51 (A) (C) - स्त्रियांच्या प्रतिष्ठेला अपमानास्पद, प्रथा सोडून देण्याची मूलभूत कर्तव्ये. कलम 46 - राज्याने विशेष काळजी घेऊन, दुर्बल घटकातील लोकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देणे आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे. कलम 47 - राज्याने आपल्या लोकांचे पोषण आणि राहणीमानाचा स्तर आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे याचबरोबर अजूनही बर्याच सुधारणा त्यांनी केल्या.

**हिंदू कोड बिल -**

हिंदू कोड बिल म्हणजे महिला मुक्तीचा जाहीरनामाच होता. या हिंदू कोड बिलाबाबत डॉ. बाबसाहेब खूप आग्रही होते. त्यामध्ये त्यांनी आधुनिक भारतातील सर्वात मोठ्या सुधारणांसह, भारतात प्रचलित असलेल्या विविध विवाह पद्धतींचा अंत करण्यासाठी आणि केवळ एकविवाहित विवाहांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी मागणी केली गेली. संहितेने स्त्रियांना मालमत्ता आणि दत्तक घेण्याचा हक्क बहाल करण्याचाही प्रयत्न केला होता जो मनूने नाकारला होता. याने सर्व कायदेशीर बाबींमध्ये स्त्री-पुरुष समान पातळीवर ठेवले. डॉ. आंबेडकर म्हणाले, "मला एका महत्त्वाच्या वस्तुस्थितीकडे घरचे लक्ष वेधायचे आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या विरोधात आपले महान पुस्तक लिहिणारे महान राजकीय तत्वज्ञानी बर्क म्हणाले की ज्यांना संवर्धन करायचे आहे त्यांनी दुरुस्तीसाठी तयार असले पाहिजे. आणि मी सर्व काही आहे. या सदनाला विचारणे आहे: जर तुम्हाला हिंदू व्यवस्था, हिंदू संस्कृती आणि हिंदू समाज टिकवून ठेवायचा असेल, तर जिथे दुरुस्ती आवश्यक आहे तिथे दुरूस्ती करण्यास संकोच करू नका, हे विधेयक हिंदू व्यवस्थेच्या जीर्ण झालेल्या भागांची दुरुस्ती करण्याशिवाय आणखी काही मागणार नाही.

बाबासाहेब आंबेडकररांची विचारधारा सर्वच हिंदू समाजाला प्रगतीच्या वाटेवर नेणारी होती. आंबेडकरांच्या निधनाबद्दल संसदेत शोकसंदेशात पंतप्रधान जवाहरलाल नेहरू म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू समाजाच्या सर्व अत्याचारी वैशिष्ट्यांविरुद्ध बंडाचे प्रतीक होते". स्त्री-पुरुष समानतेवर आधारित समाजाचे त्यांचे स्वप्न अजून पूर्ण व्हायचे आहे आणि म्हणूनच त्यांचे विचार महिला सक्षमीकरणाला अनुकूल सामाजिक पुनर्रचनेसाठी महत्त्वाचे आहेत.

27 सप्टेंबर 1951 रोजी पंतप्रधानांना दिलेल्या राजीनाम्याच्या पत्रात त्यांनी लिहिले की, "बऱ्याच दिवसांपासून मी मंत्रिमंडळातून माझ्या जागेचा राजीनामा देण्याचा विचार करत होतो. माझ्या इराद्याला प्रत्यक्षात उतरवण्यापासून केवळ एकच गोष्ट मला रोखली होती. सध्याच्या संसदेचे आयुष्य संपण्यापूर्वी हिंदू कोड बिलाची अंमलबजावणी करणे शक्य होईल या आशेने मी हे विधेयक तोडण्यास सहमती दर्शवली आणि कमीत कमी एवढ्या मोठ्या आशेने ते विवाह आणि घटस्फोटापर्यंत मर्यादित केले. आमच्या श्रमाचे फळ मिळू शकते, परंतु तरीही मला तुमच्या मंत्रिमंडळाचे सदस्य राहण्याचा कोणताही उद्देश दिसत नाही. द

हिंदू कोड बिल नंतर चार विधेयकांमध्ये विभागले गेले आणि ते संसदेत ठेवण्यात आले. हिंदू विवाह कायदा, 1955; हिंदू उत्तराधिकार कायदा, 1956; हिंदू अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा, 1956 आणि हिंदू दत्तक आणि देखभाल कायदा, 1956 हे चार अधिनियम आहेत ज्यात डॉ आंबेडकरांनी तयार केलेल्या हिंदू कोड बिलाच्या कल्पना आणि तत्त्वे समाविष्ट आहेत. ते स्वतंत्र देतात

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री मुक्तीसाठी कृतिशील लढा दिला. स्त्रियांचे शिक्षण, हक्क व अधिकार, स्त्रियांची सामाजिक स्थिती या सर्वांच्या बाबतीत ते नेहमीच आग्रही राहिले. त्यांचे विचार, कार्य यामुळे समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहेच त्यामुळेच आजच्या स्त्रियांची स्थिती बऱ्याच अंश बदललेली दिसते. म्हणूनच आजच्या महिला सक्षमीकरणाचा विचार करताना त्या पाठीमागे असणाऱ्या बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा प्रेरणा देत आहे आणि अनेक पुढेही तो दिशादर्शक असेल.

**निष्कर्ष-**

1. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांनी समाजजागृती तर केलीच पण त्याला कायद्याच्या चौकटीत ही आणले. म्हणूनच त्यांचे विचार महिला सक्षमीकरणाला अनुकूल सामाजिक पुनर्रचनेसाठी महत्त्वाचे आहेत.
2. डॉ.आंबेडकरांची शिकवण आणि विचार आजही केवळ महिलांनाच नव्हे तर सर्व भारतीयांसाठी उपयुक्त आहेत
3. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांनी समस्त महिलांच्या जीवन स्थितीवर आपले विचार मांडले. महिलांना समान प्रतिष्ठा, समान हकक हवेत याबाबत ते आग्रही राहिले. म्हणून या हिंदू कोड बिलाचे महत्व ही अनन्यसाधारण आहे.
4. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाविषयीची त्यांची तीव्र चिंता आणि भावना त्यांच्या प्रत्येक वाक्यातून आणि शब्दातून व्यक्त होत आहे. डॉ बाबासाहेबांची विचारधारा आजही तितकीच महत्वाची आहे.
5. सर्व महिलांप्रती, त्यांचा धर्म, जाती, वर्ग कोणताही असो, बाबासाहेबांचा विशिष्ट मानवतावादी दृष्टिकोन होता.
6. भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रियांच्या अधोगतीला पूर्णविराम देऊन महिलांना माणूस म्हणून हक्क देणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचे कार्य दीपस्तंभासारखे दिशादर्शक राहील.

**संदर्भ –**

1. वैचारिकता : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची, संपादक- हरिभाऊ पगार, रंगनाथ डोळस, युगांतर प्रकाशन, नाशिक.
2. 'डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल' चांगदेव खैरमोडे, सुगावा प्रकाशन पुणे.
3. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
4. 'प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर : समग्र वैचारिक चरित्र', नरेंद्र जाधव, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.